
केंद्राच्या यादीवरचे व राज्यशासनाच्या यादीवरचे संपूर्ण महाराष्ट्रात वितरित होणारे दैनिक



दैनिक

RNI. NO. MAHMAR 2011/39185

# राजस्व



सोलापूर ▸ वर्ष १४ वे ▸ अंक-३०६ | मराठी सायंदैनिक | ▸ सोमवार ०२ मार्च २०२६ | पाने ६ | किंमत २ रुपये

# रक्ताच्या नात्यानेच घेतला निरागस जीव; संशयाच्या विषारी ज्वाळेत जळाली १३ महिन्यांची चिमुकली



तुळजापूर : नात्यांवरील विश्वास हादरवणारी, माणुसकीलाच काळिमा फासणारी आणि समाजमन सुन्न करणारी एक अत्यंत धक्कादायक घटना तामलवाडी पोलीस ठाणे हद्दीत उघडकीस आली आहे.

अवघ्या १३ महिन्यांच्या निष्पाप चिमुकलीचा जीव तिच्याच सख्ख्या चुलत्याने घेतल्याचे तपासात स्पष्ट झाल्याने संपूर्ण परिसरात संताप, हळहळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संशय, कौटुंबिक तणाव आणि विकृत मानसिकतेचा कळस गाठणाऱ्या या गुन्ह्याने मानवी संवेदनांनाच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी गवळेवाडी येथील महादेव माने यांनी आपल्या १३ महिन्यांच्या मुलीला अज्ञात व्यक्तीने घरातून पळवून नेल्याची तक्रार तामलवाडी पोलीस ठाण्यात दाखल केली. अचानक घडलेल्या या घटनेने गावात एकच खळबळ उडाली. चिमुकलीचे अपहरण झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरताच ग्रामस्थांनी शोधमोहीम सुरू केली, तर पोलिसांनीही तातडीने गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. सुरुवातीला हा प्रकार बाहेरील व्यक्तीकडून घडल्याचा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र सहायक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांनी तपास करताना घटनास्थळ, कुटुंबीयांचे जबाब, हालचाली आणि परिस्थितीजन्य पुराव्यांचा बारकाईने अभ्यास केला. तपास जसजसा पुढे सरकत गेला तसतसे संशयाचे धागेदोरे घरातीलच व्यक्तीकडे जाऊ लागले. दरम्यान, गुप्त माहितीदारांकडून मिळालेल्या माहितीनंतर पोलिसांनी बालिकेचा चुलता शंकरेश्वर माने याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. सुरुवातीला दिशाभूल करणारी उत्तरे देणारा आरोपी पोलिसांच्या कसून चौकशीसमोर अखेर कोसळला आणि त्याने केलेल्या अमानुष गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीने २७ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ ते ५.३० वाजण्याच्या सुमारास झोपेत असलेल्या चिमकलीला घरातून उचलून नेले. गावालगतच्या शेतात नेऊन तिचा गळा दाबून निर्दयीपणे खून केला. एका निष्पाप जीवाचा अंत केल्यानंतरही आरोपी थांबला नाही. गुन्हा लपवण्यासाठी त्याने कोयत्याच्या साहाय्याने मृतदेहाचे तुकडे केले आणि पोत्यात भरून जवळील चारीमध्ये पुरून टाकले.

आरोपीच्या कबुलीजबाबानंतर पोलिसांनी दोन पंचांच्या उपस्थितीत घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. चारीत पुरलेला मृतदेह बाहेर काढताना उपस्थित अधिकारी व ग्रामस्थांचेही डोळे पाणावले. संपूर्ण परिसरात शोककळा पसरली होती. तपासादरम्यान या खुनामागील कारण अधिक धक्कादायक असल्याचे समोर आले. आरोपीच्या भावाची पत्नी परपुरुषासोबत निघून गेल्याच्या घटनेमुळे तो मानसिक तणावात होता. त्यातूनच पीडित बालिका आपल्या भावाची नसल्याचा संशय त्याच्या मनात निर्माण झाला.

संशयाने सूडाचे रूप घेत अखेर निरागस बालिकेचा जीव घेतल्याचे तपासात स्पष्ट झाले. अपहरणाचा बनाव करून पोलिसांची दिशाभूल करण्याचाही आरोपीने प्रयत्न केला.

मात्र तामलवाडी पोलिसांनी तपासातील वेग, तांत्रिक माहिती आणि स्थानिक माहितीदारांच्या मदतीने अवघ्या २४ तासांत गुन्ह्याची उकल करत आरोपीला बेड्या ठोकल्या. या गंभीर गुन्ह्याचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोकर व अप्पर पोलीस अधीक्षक शाफाकत आमना व उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ .निलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

सहायक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार जुबेर काझी, आकाश सुरनर, नितीन भोसले, सूरज नरवडे, नझीर बागवान, उमेश माने, तुराब शेख आणि मनोज गोबाडे यांच्या पथकाने अहोरात्र मेहनत घेत तपास पूर्ण केला. सध्या आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

या घटनेनंतर गवळेवाडी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून आरोपीस कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे. ही घटना केवळ एका बालिकेचा खून नसून समाजातील वाढत्या संशयी प्रवृत्तीचे भयावह वास्तव अधोरेखित करणारी आहे. ज्या नात्यावर संरक्षणाची जबाबदारी असते, त्याच नात्याने मृत्यूचे सावट बनणे ही समाजासाठी गंभीर इशारा देणारी बाब ठरत आहे.

## नात्यांचा ऱ्हास की मानसिक विकृती?

आजच्या बदलत्या सामाजिक वास्तवात कौटुंबिक वाद, संशय आणि भावनिक अस्थिरता यांचे परिणाम किती भयानक होऊ शकतात, याचे हे विदारक उदाहरण आहे. संतापाच्या एका क्षणाने एका निष्पाप जीवाचे आयुष्य संपवले आणि दोन कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त केले. निरागस बालिकेच्या हत्येने केवळ एका घराचा दिवा विझलेला नाही, तर समाजाच्या संवेदनशीलतेलाच धक्का बसला आहे. संशय आणि सूडभावना जर विवेकावर मात करू लागल्या, तर माणूस किती क्रूर बनू शकतो, याची ही थरकाप उडवणारी आठवण ठरली आहे.



जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र- १ दिनांक १८/१०/२०२३

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११**
**(महाराष्ट्र शासन अंगीकृत)**
**कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग भीमानगर**
**तालुका माढा जिल्हा सोलापूर**
**ईमेल : eeudmd@yahoo.co.in**
**दूरध्वनी क्र०२१८३-२३६५१२, फॅक्स ०२१८३-२३६५५१**

**ई-निविदा सूचना क्र. ६ सन २०२५-२६ दुबार मागणी**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भिमानगर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे फक्त सोलापूर जिल्हयातील सक्षम मजूर सहकारी संस्था / सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भिमानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | जिल्हा | कंत्राटदाराचा वर्ग | निविदेची किंमत रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | सीना माढा पंपगृह ट्रॅशरॅक साफ करणे, पंपगृह फोरबे मधील गाळ काढणे. | सोलापूर | सक्षम मजूर सहकारी संस्था | १६.३७ लक्ष |
| २ | उजनी धरण भिंतीतील सा.क्र. ११०० ते १३०० मी. व १५५० ते १७२२ मी. मधील सच्छिद्र नलिका (VPD) स्वच्छ करणे. | सोलापूर | सक्षम मजूर सहकारी संस्था | २५.९७ लक्ष |

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक ०२/०३/२०२६ ते दिनांक ०९/०३/२०२६
ई-निविदा उघडण्याचा दिनांक ११/०३/२०२६

(सु.उ.डुंबरे)
कार्यकारी अभियंता
उजनी धरण व्यवस्थापन विभाग
भीमानगर

# संपादकीय

## महामहिमांच्या श्रीमुखात

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी तमिळनाडूसंदर्भात दिलेला निकाल ही केवळ तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांना एकट्याला लगावलेली चपराक नाही. हा निकाल देशातील समस्त राजभवनी महामहिमांच्या श्रीमुखात भडकावतो. त्याचे महत्त्व समजून घेण्याआधी गेल्या काही वर्षांत देशातील भाजपेतर राज्यांतील राज्यपालांच्या उच्छादाची दखल घ्यावी लागेल. अन्य पक्षीय सरकारांना वाकवण्यासाठी राजभवनांतील नाना-नानी उद्यानांचा वापर करणारा भाजप हा पहिलाच पक्ष आहे असे नाही. काँग्रेसच्या काळातही हे झाले. पण त्या काळात निदान आदरणीय म्हणता येतील अशा व्यक्ती, जसे की पी. सी. अलेक्झांडर, एअर चीफ मार्शल आय. एच. लतीफ इत्यादी, या पदासाठी निवडल्या जात आणि जे इतके आदरणीय नसत ते निदान निष्पक्षतेचा आव तरी आणत. तथापि गेल्या दहा वर्षांत ही किमान पातळीही सोडली गेली आणि राजभवनांत पक्षांतील निरुपद्रवी/ उपद्रवी वृद्धांची सोय करण्याची प्रथा पडली. हे कृतकृत्य राज्यपाल मग कोणत्याही थरास गेले. उदाहरणार्थ महाराष्ट्राचे भगतसिंह कोश्यारी वा तमिळनाडूचे रवी. या धरबंध सोडलेल्या राज्यपालांस खरे तर सत्ताधारी पक्षाने आवरायला हवे होते. पण ते पाहुण्याच्या वहाणेने विरोधी पक्षीयांचा विंचू ठेचण्याच्या आनंदात मग्न. 'लोकसत्ता'ने सातत्याने राज्यपालांच्या नियमबाह्य वर्तनावर आसूड ओढले. 'राजभवनी कंडूशमन' (१४ फेब्रुवारी २४), 'राज्यपाल की मेंढपाल' (१५ ऑक्टोबर २०), 'या राज्यपालांना आवरा' (२५ मे २०), 'राजभवनातील राधाक्का' (१० ऑगस्ट २२) आदी संपादकीयांत या मोकाट सुटलेल्या राज्यपालांस वेसण घालण्याची गरज व्यक्त करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निकाल ती पूर्ण करतो. ही समाधानाची बाब. ''निवडून आलेल्या सरकारने संमत केलेली विधेयके अनंत काळ रोखून धरण्याचा अधिकार राज्यपालांना नाही'' असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडूतील द्रमुक सरकारच्या पायात पाय घालण्याचा राज्यपाल रवी यांचा प्रयत्न 'घटनाबाह्य' ठरवला. इतकेच नाही; तर या राज्यपालाने अडवून धरलेल्या तब्बल १० विधेयकांस 'महामहिमांची मंजुरी आहे; असे समजावे' असा निकाल दिला. या दहापैकी काही विधेयके २०२० सालच्या जानेवारी महिन्यातील आहेत. म्हणजे त्यास पाच वर्षांहून अधिक काळ लोटला. ती मंजूर करण्यास या राज्यपालांस वेळ मिळाला नाही. एखादे विधेयक विधानसभेने मंजूर करून राज्यपालांकडे पाठवले की कित्येक महिने ते त्यावर निर्णयच देत नसत. सरकारने फारच तगादा लावला की ही विधेयके नामंजूर करून पुन्हा सरकारकडे पाठवली जात. त्यामुळे सरकारला ती पुन्हा एकदा विधानसभेत मंजूर करवून घ्यावी लागत. वास्तविक, विधानसभेने पुन्हा संमत केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्याखेरीज अन्य पर्याय राज्यपालांस नाही हे साधे शालेय नागरिकशास्त्र शिकलेल्यासही कळेल. पण रवी पडले निवृत्त आयपीएस. आयुष्यभर गणवेषीय उच्चपदस्थ चाकरी करणाऱ्यांच्या ठायी एक प्रकारे 'मी म्हणेन ती पूर्व' अशी वृत्ती तयार होते. रवी यांच्यात ती निश्र्चित असणार. कारण विधानसभेने दुसऱ्यांदा मंजूर केलेली विधेयकेदेखील हे महामहीम प्रदीर्घ काळ दाबून ठेवत. राज्य सरकारने त्याविरोधात फारच बभ्रा केला की या विधेयकांचा चेंडू राष्ट्रपतींच्या अंगणात टोलवला जात असे. त्या स्वतंत्र विचार करून निर्णय घेण्याबाबत राजभवनी निवासितांपेक्षा गुणांनी सरस असल्याचे उदाहरण तूर्त तरी नाही. सबब तेथेही ही विधेयके विनानिर्णय पडून राहत. अखेर तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन हे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याइतके 'सौजन्यशील' नसल्याने त्यांच्या सरकारने या महामहिमांस न्यायालयात खेचण्याचे कष्ट घेतले. त्याचे फळ त्यांस मिळाले. लोकनियुक्त सरकारने विधानसभेत बहुमताने मंजूर केलेल्या विधेयकाविरोधात नकाराधिकार वापरण्याचा अधिकार राज्यपालांस नाही, इतक्या स्पष्टपणे सर्वोच्च न्यायालयाच्या न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या पीठाने घटनात्मक वास्तव स्पष्ट करून 'राज्यपाल' या पदास नियमांच्या चौकटीत आणले. मंजूर केलेले विधेयक समोर आल्यावर राज्यपालांस तीन पर्याय असतात. ते मंजूर करणे, नाकारणे आणि राष्ट्रपतींच्या विचारार्थ पाठवणे. यातील तिसरा पर्याय निवडायचा असेल तर राज्यपालांनी तो वेळीच निवडायला हवा, आधीच्या नकारानंतर विधानसभेने तेच विधेयक जसेच्या तसे मंजूर केल्यावर मग ते राष्ट्रपतींच्या विचारार्थ धाडण्याची सोय राज्यपालांस नाही. दुसऱ्यांदा विधेयक मंजूर झाल्यास त्यास मुकाट संमती देण्यास राज्यपाल बांधील आहेत. हे सर्व मुद्दे या निकालात सर्वोच्च न्यायालय स्पष्ट करतेच. पण त्याच वेळी राज्यपालांस विधेयक मंजुरीसाठी वेळेची मुदत घालून देते. यापुढे राज्यपालांस मंजूर होऊन संमतीसाठी आलेल्या विधेयकावरील पहिला निर्णय एका महिन्याच्या आत घ्यायला हवा आणि अन्य निर्णयांसाठी तीन महिन्यांखेरीज अधिक वेळ त्यांना मिळणार नाही. मुळात प्रदीर्घ काळ विधेयकावर निर्णयच घ्यायचा नाही आणि तो घेतला जावा यासाठी आरडाओरडा झाल्यावर ते विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवण्याचा राजकीय चलाखपणा भाजपेतर राज्यांचे राज्यपाल अलीकडे वारंवार करताना दिसतात. ही सोय यापुढे बंद होईल. तमिळनाडूच्या रवी यांस राज्यघटनेच्या मात्रेचे चार कडू वळसे चाटवताना न्यायालयाने सर्वच राज्यपालांसाठी विधेयक मंजुरीची नियमावली आखून दिली. या निकालातील सर्वोत्तम बाब ही. राज्यपाल/राष्ट्रपती या घटनात्मक पदांचा आपल्याकडे निष्कारण बागुलबुवा आहे. हे महामहीम राजभवनी जो खर्च करतात, त्याचा ना हिशेब दिला जातो ना त्याची चर्चा विधानसभेत करता येते. कारण राज्यघटनेने दिलेले संरक्षण. वास्तविक अन्य सर्व पदांइतकेच या पदाचेही अवमूल्यन झाले असून त्या पदावरील नियुक्त्या केवळ पक्षीय सोयीसाठी आणि विरोधकांच्या गैरसोयीसाठीच केल्या जातात. विरोधकांची जो अधिक गैरसोय करू शकेल तो सत्ताधीशांस अधिक प्रिय. त्यातून घटनात्मक पदावर नेमल्यावर तरी आपल्या धन्याची चाकरी करताना दिसणे बरे नाही; इतकाही विचार न करणारी मंडळी राजभवनी बसवली गेली. तेव्हा त्यांच्याकडून काय अपेक्षा करणार? तमिळनाडूचे राज्यपाल रवी त्यातलेच. पंजाब, पश्र्चिम बंगाल, केरळ, राष्ट्रवादी- शिवसेना- काँग्रेसचे सरकार असताना महाराष्ट्र अशा अनेक भाजपेतर राज्यांत या महामहिमांनी धुडगूस घातला. त्यांस आळा घालण्याची गरज होतीच. ते काम तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी केले. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा कायदा होतो

# उन्हाळ्यात मधुमेहाच्या रुग्णांनी 'या' ५ फळांचे सेवन चुकूनही करू नये;




उन्हाळ्यात मधुमेहाच्या रुग्णांनी 'या' ५ फळांचे सेवन चुकूनही करू नये; भारतातील अनेक जण हे मधुमेहग्रस्त आहेत. मधुमेह हा जीवनशैलीमुळे झपाट्याने वाढणारा आजार आहे. दुर्दैवाने यावर कोणताही इलाज नाही. एकदा का मधुमेहाची लागण झाली, तर तुम्हाला त्याच्यासोबतच जगावं लागतं. मधुमेह असलेल्या लोकांना विशेषत: उच्च किंवा कमी रक्तातील साखरेचा सामना करावा लागतो, ज्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होतो. खाण्यापिण्याच्या बदललेल्या सवयी, अयोग्य वेळा आणि शारीरिक कष्टाचा अभाव यांमुळे मधुमेहासारखे आजार मागे लागतात. मात्र, डायबिटिजवर नियंत्रण ठेवल्यास चांगले जीवन जगता येते. मधुमेहाच्या रुग्णांना आजारात आहारावर लक्ष ठेवावे लागत असते. मधुमेहाच्या रुग्णांनी कोणती फळे खाऊ नयेत हे जाणून घेणे सर्वांत महत्त्वाचे आहे. त्याविषयी तज्ज्ञांनी माहिती दिल्याचे वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्याबाबत सविस्तर जाणून घेऊ मधुमेहाच्या रुग्णांनी चुकूनही खाऊ नयेत 'ही' फळे

१. द्राक्षे
मधुमेहाच्या रुग्णांसाठी द्राक्षे अत्यंत हानिकारक मानली जातात. द्राक्षे खाल्ल्याने रक्तातील साखर झपाट्याने वाढू शकते. त्यामध्ये फ्रुक्टोज आणि ग्लुकोजचे प्रमाण खूप जास्त असते. त्यामुळे द्राक्षांपासून मधुमेहाच्या रुग्णांनी लांब राहिलेलेच चांगले ठरेल.

२. चेरी
चेरी हे फळ अनेकांना आवडते. पण, एक कप चेरीमध्ये साधारण २० ग्रॅम साखर असते. त्यामुळे मधुमेही रुग्णांनी चेरी खाणे टाळावे.

३. अननस
क जीवनसत्त्व असलेले अननस फळ जास्त प्रमाणात खाल्ल्याने रक्तातील साखरेचे प्रमाण झपाट्याने वाढते. त्यात कार्बोहायड्रेट्सचे प्रमाण जास्त असते, जे रक्तात लवकर विरघळते आणि ग्लुकोज वाढवते. अननसामध्ये सहा ग्रॅम साखर असते. ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असेल तितक्या प्रमाणात रक्तातील साखरेची पातळी वाढते. त्यामुळे मधुमेहींना अननस मर्यादित प्रमाणात खाण्याचा सल्ला दिला जातो.

४. आंबे
फळांचा राजा सर्वांचा आवडता आहे; पण आंब्यामध्ये साखरेचे प्रमाणही जास्त असते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढते. जर मधुमेही रुग्णांनी मोठ्या प्रमाणात आंबे खाल्ले, तर त्यांना हृदयरोग किंवा स्ट्रोकचा धोका होऊ शकतो. मधुमेहाच्या रुग्णांना साधारणपणे आंबा न खाण्याचा किंवा मर्यादित प्रमाणात खाण्याचा सल्ला दिला जातो.

५. केळी
केळी आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे; परंतु केळी खाल्ल्याने साखर आणि कर्बोदकांचे प्रमाण वाढू शकते. मधुमेह असलेल्या लोकांनी केळे हे फळ मर्यादित प्रमाणातच खावे. जास्त केळी खाल्ल्याने साखरेची पातळी वाढू शकते. वरील कोणतेही फळ खाण्यापूर्वी मधुमेही रुग्णांनी डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

# रक्ताच्या नात्यानेच घेतला निरागस जीव; नात्यांचा ऱ्हास की मानसिक विकृती?



तुळजापूर : नात्यांवरील विश्वास हादरवणारी, माणुसकीलाच काळिमा फासणारी आणि समाजमन सुन्न करणारी एक अत्यंत धक्कादायक घटना तामलवाडी पोलीस ठाणे हद्दीत उघडकीस आली आहे. अवघ्या १३ महिन्यांच्या निष्पाप चिमुकलीचा जीव तिच्याच सख्ख्या चुलत्याने घेतल्याचे तपासात स्पष्ट झाल्याने संपूर्ण परिसरात संताप, हळहळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संशय, कौटुंबिक तणाव आणि विकृत मानसिकतेचा कळस गाठणाऱ्या या गुन्ह्याने मानवी संवेदनांनाच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी गवळेवाडी येथील महादेव माने यांनी आपल्या १३ महिन्यांच्या मुलीला अज्ञात व्यक्तीने घरातून पळवून नेल्याची तक्रार तामलवाडी पोलीस ठाण्यात दाखल केली. अचानक घडलेल्या या घटनेने गावात एकच खळबळ उडाली. चिमुकलीचे अपहरण झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरताच ग्रामस्थांनी शोधमोहीम सुरू केली, तर पोलिसांनीही तातडीने गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. सुरुवातीला हा प्रकार बाहेरील व्यक्तीकडून घडल्याचा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र सहायक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांनी तपास करताना घटनास्थळ, कुटुंबीयांचे जबाब, हालचाली आणि परिस्थितीजन्य पुराव्यांचा बारकाईने अभ्यास केला. तपास जसजसा पुढे सरकत गेला तसतसे संशयाचे धागेदोरे घरातीलच व्यक्तीकडे जाऊ लागले. दरम्यान, गुप्त माहितीदारांकडून मिळालेल्या माहितीनंतर पोलिसांनी बालिकेचा चुलता शंकरेश्वर माने याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. सुरुवातीला दिशाभूल करणारी उत्तरे देणारा आरोपी पोलिसांच्या कसून चौकशीसमोर अखेर कोसळला आणि त्याने केलेल्या अमानुष गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीने २७ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ ते ५.३० वाजण्याच्या सुमारास झोपेत असलेल्या चिमुकलीला घरातून उचलून नेले. गावालगतच्या शेतात नेऊन तिचा गळा दाबून निर्दयीपणे खून केला. एका निष्पाप जीवाचा अंत केल्यानंतरही आरोपी थांबला नाही. गुन्हा लपवण्यासाठी त्याने कोयत्याच्या साहाय्याने मृतदेहाचे तुकडे केले आणि पोत्यात भरून जवळील चारीमध्ये पुरून टाकले. आरोपीच्या कबुलीजबाबानंतर पोलिसांनी दोन पंचांच्या उपस्थितीत घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. चारींत पुरलेला मृतदेह बाहेर काढताना उपस्थित अधिकारी व ग्रामस्थांचेही डोळे पाणावले. संपूर्ण परिसरात शोककळा पसरली होती. तपासादरम्यान या खुनामागील कारण अधिक धक्कादायक असल्याचे समोर आले. आरोपीच्या भावाची पत्नी परपुरुषासोबत निघून गेल्याच्या घटनेमुळे तो मानसिक तणावात होता. त्यातूनच पीडित बालिका आपल्या भावाची नसल्याचा संशय त्याच्या मनात निर्माण झाला. संशयाने सूडाचे रूप घेत अखेर निरागस बालिकेचा जीव घेतल्याचे तपासात स्पष्ट झाले. अपहरणाचा बनाव करून पोलिसांची दिशाभूल करण्याचाही आरोपीने प्रयत्न केला. मात्र तामलवाडी पोलिसांनी तपासातील वेग, तांत्रिक माहिती आणि स्थानिक माहितीदारांच्या मदतीने अवघ्या २४ तासांत गुन्ह्याची उकल करत आरोपीला बेड्या ठोकल्या. या गंभीर गुन्ह्याचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोकर व अप्पर पोलीस अधीक्षक शाफाकत आमना व उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ .निलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार जुबेर काझी, आकाश सुरनर, नितीन भोसले, सूरज नरवडे, नझीर बागवान, उमेश माने, तुराब शेख आणि मनोज गोबाडे यांच्या पथकाने अहोरात्र मेहनत घेत तपास पूर्ण केला. सध्या आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. या घटनेनंतर गवळेवाडी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून आरोपीस कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे. ही घटना केवळ एका बालिकेचा खून नसून समाजातील वाढत्या संशयी प्रवृत्तीचे भयावह वास्तव अधोरेखित करणारी आहे. ज्या नात्यावर संरक्षणाची जबाबदारी असते, त्याच नात्याने मृत्यूचे सावट बनणे ही समाजासाठी गंभीर इशारा देणारी बाब ठरत आहे.

..............

चौकट........................

नात्यांचा ऱ्हास की मानसिक विकृती?

आजच्या बदलत्या सामाजिक वास्तवात कौटुंबिक वाद, संशय आणि भावनिक अस्थिरता यांचे परिणाम किती भयानक होऊ शकतात, याचे हे विदारक उदाहरण आहे. संतापाच्या एका क्षणाने एका निष्पाप जीवाचे आयुष्य संपवले आणि दोन कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त केले. निरागस बालिकेच्या हत्येने केवळ एका घराचा दिवा विझलेला नाही, तर समाजाच्या संवेदनशीलतेलाच धक्का बसला आहे. संशय आणि सूडभावना जर विवेकावर मात करू लागल्या, तर माणूस किती क्रूर बनू शकतो, याची ही थरकाप उडवणारी आठवण ठरली आहे.

This daily evening news paper ,owner,publisher ,printer, Editor,Prasad Sanjay Pawar, printed at RAJASWA printing press , 53/A Budhawar Peth ,Laxman Maharaj Nagar ,SOLAPUR and published here It is not possible that editors of this article will agree ( solapur jurisdiction) Mo-7387386385

सायंदैनिक राजस्व



# सोलापूर महापालिकेच्या स्थायी समितीवर ‘उत्तर’चाच शिक्का;

सोलापूर महानगरपालिकाच्या स्थायी समिती सभापतीपदासाठी शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील नगरसेवकांची वर्णी लागणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. सभापतीची निवड ६ मार्च रोजी होणार असून, ४ मार्च रोजी उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार आहेत.

रविवारी सोलापूर दौऱ्यावर आलेले पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत शहरातील पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सभापती निवडीसंदर्भात सविस्तर चर्चा झाली. शहरातील तीनही विधानसभा मतदारसंघांमध्ये सत्तासंतुलन राखण्याचा मुद्दा बैठकीत अधोरेखित करण्यात आला.

तीन मतदारसंघांमध्ये सत्तासंतुलन

महापौर पद – सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ

सभागृह नेते व उपमहापौर पद – दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघ

स्थायी समिती सभापती पद – सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघ (निश्चित) या पार्श्वभूमिवर उत्तर मतदारसंघातील चार नावे चर्चेत आली आहेत:अविनाश पाटील,बिजू प्रधाने,गणेश वानकर,रजिता चाकोते

दक्षिण सोलापूर मतदारसंघातून येणाऱ्या संगीता जाधव यांचे नाव या स्पर्धेतून मागे पडल्याचे स्पष्ट झाले आहे.

अंतिम निर्णय ४ मार्चलाच?

बैठकीत चर्चिलेल्या चार नावांपैकी एक नाव पालकमंत्री गोरे वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करून शहराध्यक्षांना कळवणार आहेत. स्वीकृत नगरसेवक निवडीप्रमाणेच सभापती निवडीतही गुप्तता पाळली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दरम्यान, भाजपमधील अंतर्गत राजकारण लक्षात घेता पालकमंत्री जयकुमार गोरे व आमदार देवेंद्र कोठे अनपेक्षित नाव पुढे आणण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ‘जोर का झटका धीरे से’ अशी राजकीय घडामोड होण्याचीही चर्चा रंगू लागली आहे.

सभापतीपदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडणार, याकडे आता संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. ४ मार्च रोजीच या सस्पेन्सवर पडदा पडणार आहे

# नवी मुंबईत त्यांच्या नावाने रुग्णालय उभारणार –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नवी मुंबई, दि. १ : ‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी धर्म व संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेली शहादत ही जगाच्या इतिहासातील अद्वितीय घटना आहे. त्यांच्या बलिदानाची गाथा केवळ एका कार्यक्रमापुरती मर्यादित न राहता ती पुढील पिढीपर्यंत पोहचली जावी. यासाठी शालेय अभ्यासक्रमात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या बलिदानाच्या इतिहासाचा समावेश केला जाणार आहे. तसेच नवी मुंबई परिसरात त्यांच्या नावाने रुग्णालय उभारण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

अल्पसंख्याक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समिती यांच्या वतीने खारघर येथे ‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शिख समाजाचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी भारतीय संस्कृती वाचवण्यासाठी १६७५ मध्ये आपले शीश अर्पण करून शहादत दिली. त्यांच्या या बलिदानामुळे आज आपण स्वाभिमानाने आपली श्रद्धा जोपासू शकतो. त्यांच्या या बलिदानाच्या स्मरणार्थ संपूर्ण महाराष्ट्रात शहिदी समागम आयोजित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला.

हा कार्यक्रम केवळ शीख समाजापुरता मर्यादित नसून सर्व श्रद्धावान नागरिकांचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागपूर, नांदेड आणि नवी मुंबई येथे शहिदी समागम मोठ्या प्रमाणावर पार पडल्याचे सांगून देश-विदेशातून भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाल्याचा उल्लेख त्यांनी केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र आणि पंजाब यांचे नातेही विशेष आहे. संत नामदेव महाराज महाराष्ट्रातून पंजाबमधील घुमान येथे गेले. त्यांच्या रचना गुरु ग्रंथ साहिबमध्ये आहेत. तसेच गुरु गोविंद सिंग महाराष्ट्रात आले आणि त्यांनी नांदेड येथे अखेरचा श्वास घेतला. गुरु गोविंद सिंग यांच्या कुटुंबातील तीन पिढ्यांनी शहादत दिली, असे उदाहरण जगात क्वचितच आढळते.

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे कार्य संपूर्ण मानवतेच्या इतिहासातील एक गौरवशाली पान

– उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ’हिंद की चादर’ म्हणून ओळखले जाणारे, मानवतेचे रक्षक आणि महान त्यागी श्री गुरु तेग बहादुर साहीबजी यांचा त्याग मानवतेच्या इतिहासातील गौरवपूर्ण पर्व आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजींचे बलिदान हे केवळ इतिहास नाही, तर ते संपूर्ण मानवतेच्या इतिहासातील एक गौरवशाली पान आहे. संस्कृती, परंपरेच रक्षण करण्यासाठी श्री गुरु तेग बहादुर साहीबजी यांनी प्राणांची आहुती दिली. त्यांचे कार्य अतूट श्रद्धा आणि अतूट धैर्याचे उदाहरण आहे.



श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्याकडे शस्त्रे नव्हती, पण त्यांच्याकडे सत्य आणि करुणेची ताकद होती. त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवून गोरगरिबांना न्याय मिळवून दिला. सच्चा धर्म तोच, जो दुसऱ्याच्या धर्माचा आदर करतो आणि रक्षण करतो, असेही श्री.शिंदे यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र आणि पंजाबच्या ऐतिहासिक संबंधांवर प्रकाश टाकत नांदेड ही गुरु गोविंद सिंहजींची कर्मभूमी आहे, तर संत नामदेव महाराजांनी भागवत धर्माची पताका पंजाबमध्ये फडकवली असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

श्री गुरु तेग बहादुर साहिबजींचे विचार जनमानसात पोहोचवण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. आम्ही राज्यभरात डिजिटल रथांच्या माध्यमातून या महान बलिदानाची गाथा घराघरात पोहोचवित आहोत. सिख, सिकलकर, बंजारा , लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीकि, उदासीन आणि भगत नामदेव (वारकरी) संप्रदाय या सर्व समाजांना एका सूत्रात बांधून श्री गुरु तेग बहादुर साहिबाजी यांचे कार्य व विचार पुढील पिढीपर्यंत पोहचविण्याचा मानस उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांचे मानवतेसाठी अद्वितीय बलिदान आजही प्रेरणादायी

– उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

‘हिंद दी चादर’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवाधिकारांच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान आजच्या काळातही प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या की, सतराव्या शतकात अन्यायाविरुद्ध निर्भयपणे उभे राहून श्री गुरु तेग बहादुर साहिबांनी भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे, हीच या समागम कार्यक्रमाची खरी प्रेरणा आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गुरु नानक देव यांना वंदन करत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या शिकवणीचा उल्लेख केला. प्रार्थना, परोपकार, सेवा, साधेपणा आणि निर्भयता यांचा संदेश श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी दिला. त्यांच्या वचनांचा समावेश गुरु ग्रंथ साहिबमध्ये असून, त्यांच्या बलिदानामुळे सिख धर्मातील शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक बळकट झाली.

कुणालाही घाबरवू नका आणि कुणालाही घाबरू नका हा संदेश आजच्या धावपळीच्या जीवनात अधिकच महत्त्वाचा ठरतो, असे नमूद करत समाजात प्रेम, एकता आणि बंधुभाव जोपासण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले. हा ३५० वा शहिदी समागम कार्यक्रम सर्व भाविकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त त्यांनी व्यक्त केला.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राज्यस्तरीय समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, अखिल भारतीय धर्मजागरणचे प्रमुख शरदराव ढोले, शहिदी समागम समितीचे मार्गदर्शक बाबा हरनाम सिंह जी, मुखी, दमदमी टकसाल, प्रधान संत समाज, बंजारा समाजाचे धर्मगुरू बाबूसिंग महाराज, राज्यस्तरीय समन्वय समितीचे निमंत्रक बल मलकित सिंह, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार मंदाताई म्हात्रे, मुंबईच्या महापौर रितू तावडे, पनवेलचे महापौर नितीन पाटील, आदी उपस्थित होते.

# गृहमंत्री अमित शाह यांनी दिली लंगरसेवा

## ‘हिंद-दी-चादर’ समागम कार्यक्रमात भक्तिभावाचा अनोखा संदेश

नवी मुंबई, दि. २८ (विमाका):- गृहमंत्री अमित शाह यांनी खारघर, नवी मुंबई येथे आयोजित ‘हिंद-दी-चादर’ समागम कार्यक्रम दरम्यान स्वतः लंगरमध्ये संत महंताना भोजन वाढून सेवा दिली. ‘सेवा हीच खरी श्रद्धा’ या शीख परंपरेचा आदर्श त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही भोजन वाढून लंगर सेवा दिली.

कार्यक्रमस्थळी सकाळपासून रात्रीपर्यंत अखंड लंगर सुरू असून सर्वधर्मीय भाविकांसाठी विनामूल्य भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. आठ ठिकाणी सुरू असलेल्या लंगरमध्ये हजारो स्वयंसेवक सेवा बजावत आहेत. भाई जैताजी लंगर सेवा, राधास्वामी ब्यास लंगर सेवा, बाबा मक्खन शाह लबाना लंगर सेवा, संत सेवालाल महाराज लंगर सेवा, बाबा दीप सिंघा ब्यास लंगर सेवा, भगवान झुलेलालजी लंगर सेवा, भाई मतीदासजी लंगर सेवा या आठ सेवादार लंगरमध्ये पहिल्या दिवशी लाखो भाविकांनी लंगरचा लाभ घेतला, तर दुसऱ्या दिवशी हा प्रतिसाद अधिक वाढला असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या समागम कार्यक्रमात गुरु ग्रंथ साहिब यांच्या पावन उपस्थितीत कीर्तन व धार्मिक कार्यक्रम सुरू होते. वाहे गुरु आणि बोले सो निहाल, सत श्री अकालच्या जयघोषात भाविकांनी दर्शन व लंगर सेवेचा लाभ घेत घेतला.

लंगर ही केवळ भोजन व्यवस्था नसून समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारी परंपरा आहे. गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांनी स्वतः लंगर सेवा देत या परंपरेचा सन्मान केला. ‘हिंद-दी-चादर’ समागमातून सामाजिक ऐक्य आणि एकात्मतेचा प्रभावी संदेश दिला.



# ब्रह्माकुमारीज सेवाकेंद्रात बालब्रह्मचारी तपस्वी कुमारांसाठी राजयोग तपस्या कार्यक्रमाचा शुभारंभ

बार्शी, प्रतिनिधी ( राजश्री गवळी ) दि. २८ फेब्रुवारी : सोलापूर उपक्षेत्रातील बालब्रह्मचारी तपस्वी कुमारांसाठी ब्रह्माकुमारीज बार्शी सेवाकेंद्रात द्विदिवसीय राजयोग तपस्या कार्यक्रम (योग भट्टी)चे आयोजन करण्यात आले आहे. २९ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी पहाटे ४ ते रात्री ९ पर्यंत विविध सत्रांचे आयोजन असून मुंबईतील बहुराष्ट्रीय कंपनीत सेवारत तपस्वी कुमार व प्रेरक वक्ता ब्र. कु. राजीव गुप्ता हे मार्गदर्शन करणार आहेत.२८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ११.३० वाजता बार्शी सेवाकेंद्राच्या नवनिर्मित राजयोग भवनात या कार्यक्रमाचे विधिवत उद्घाटन झाले. सेवाकेंद्र संचालिका संगीता दिदी, राजीव गुप्ता, सोलापूर उपक्षेत्रातील राजयोग शिक्षिका ब्रह्माकुमारी भगिनी यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने उद्घाटन झाले. वक्ते व सर्व राजयोग शिक्षिका ब्रह्माकुमारी भगिनींचे व तपस्वी कुमारांचे संगीता दिदी व निशा दिदींनी तिलक, पुष्पगुच्छ व प्रसाद देऊन स्वागत केले.

स्वागतपर मनोगतात संगीता दिदी म्हणाल्या, राजीवभाईंच्या सान्निध्यात दोन दिवस आपला वेळ सफल करून सर्व कुमारांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली तपस्या करावी. स्वतःला शक्तीच्या खजिन्यांनी संपन्न करावे. विद्यालयाचे साकार संस्थापक आदिपिता ब्रह्माबाबांसारखे जीवन बनवायचे असा निश्चय करावा.

राजीव गुप्ता म्हणाले, मनात जशा भावना असतात तशा शरीरात संवेदना निर्माण होतात. संकल्पाची गती कमी करून शांतीचा अनुभव घेणे, मनोबल वाढवणे हा या तपस्या कार्यक्रमाचा उद्देश आहे. त्यांनीक्रिएटिव्हमेडिटेशनचे (रचनात्मक योगसाधना) विविध प्रयोग करवून घेतले. अगदी फलाहार सेवनालाही क्रिएटिव्ह मेडिटेशनचे रूप दिले.पहिल्या दिवशी सोलापूर उपक्षेत्रातील ५० पैकी २५ कुमारांनी हजेरी लावली. राजयोग भवनातील स्वच्छता, शांत वातावरण व सुव्यवस्थित नियोजनामुळे कुमारसेना भारावली. पहिल्या सत्राच्या शेवटी उपक्षेत्र संचालिका सोमप्रभा दिदींचे आगमन होताच या कुमारांचा आनंद द्विगुणित झाला.



# तुळजापूर पोलिसांची अवैध मद्यविक्रीविरोधात धडक कारवाई

## तिघांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे दाखल

तुळजापूर : शहर व तालुक्यात सुरू असलेल्या अवैध मद्यविक्रीला आळा घालण्यासाठी तुळजापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने शुक्रवारी (दि.२७ फब्रुवारी) दिवसभरात सलग कारवाया करत तिघांकडून देशी-विदेशी मद्याचा साठा जप्त केला. पोलिसांच्या या धडक मोहिमेमुळे अवैध दारू विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून परिसरात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. पहिल्या कारवाईत सुशांत कैलास माळी (वय २१, रा. तांदुळवाडी, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर) याला दुपारी सुमारे १.५० वाजण्याच्या सुमारास विश्वनाथ कॉर्नर परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे अवैधरित्या विक्रीसाठी ठेवलेल्या अंदाजे २ हजार रुपये किंमतीच्या देशी-विदेशी मद्याच्या ४० सिलबंद बाटल्या पोलिसांनी जप्त केल्या. यानंतर दुसऱ्या कारवाईत अमर रावसाहेब जाधव (वय ३६, रा. तिर्थ खुर्द, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) याच्याकडून सायंकाळी ४.३० वाजता भवानी ढाब्यासमोर छापा टाकून अंदाजे ८६० रुपये किंमतीच्या ११ मद्याच्या सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. संबंधित व्यक्ती अवैध विक्रीच्या




उद्देशाने मद्यसाठा बाळगत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. तिसऱ्या कारवाईत रात्री ८ वाजण्याच्या सुमारास मंगरूळ येथील तुळजाभवानी हॉटेलसमोर सचिन मधुकर धुरगुडे (वय ४२, रा. मंगरुळ, ता. तुळजापूर) याच्याकडून अंदाजे ७६० रुपये किंमतीच्या १९ देशी-विदेशी मद्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. पोलिसांनी त्वरित कारवाई करत मद्यसाठा ताब्यात घेत आरोपीस अटक केली. या तिन्ही घटनांप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम ६५ (ई) अन्वये स्वतंत्र तीन गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. अवैध मद्यविक्री रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली असून अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे. दरम्यान, अवैध मद्यविक्रीमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांनीही संशयास्पद हालचालींची माहिती पोलिसांना देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तुळजापूर पोलिसांच्या या सततच्या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांवर मोठा अंकुश बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# राष्ट्रहितासाठी विज्ञानाचे सकारात्मक संशोधन काळाची गरज

## राष्ट्रीय विज्ञान दिनाप्रसंगी डॉ संदीप देशमुख यांचे प्रतिपादन




धाराशिव,दि.२८ येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन विद्यार्थ्यांच्या पोस्टर प्रदर्शनाने आणि व्याख्यानाने मोठ्या उत्साहात संपन्न झाला, उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ संदीप देशमुख यांनी वरील प्रतिपादन केले, ते पुढे म्हणाले की ,विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन विद्यार्थ्यांची संशोधनात्मक प्रवृत्ती वाढीस लागणे गरजेचे आहे, मागील बारा वर्षांपासून महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनी विज्ञान परिषद आयोजित केली जाते,या परिषदेमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुभवातून शिक्षणाची,ज्ञानाची प्राप्ती होते,या अनुभवाच्या आणि अभ्यासाच्या जोरावर आजपर्यंत महाविद्यालयातील बरेच विद्यार्थी मोठ्या पदावर काम करत आहेत, वैज्ञानिक आविष्कार हे सामाजिक कल्याणाच्या विकासाचे भान ठेवून होत असतात असे अनमोल विचार त्यांनी यावेळी मानले . महाविद्यालयातील विज्ञान मंडळ आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञानक्षेत्रील महिलांचा सहभाग विकसित भारतासाठी प्रेरक हे ब्रीद घेऊन यावेळी भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ के. एच वनंजे यांनी कृष्णविवर या वैज्ञानिक विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, पोस्टर सादरीकरणामध्ये एकुण ४३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला, यावेळी परिक्षक म्हणून रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ मकरंद चौधरी, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख , डॉ.ए.देवकर, व्यंकटेश महाजन महाविद्यालय धाराशिव यांनी काम पाहिले, पोस्टर सादरीकरणामध्ये रसायनशास्त्र विभागातील गीतांजली बालाजी करवर प्रथम, संगणक विभागातील साक्षी रमेश हुंबे द्वितीय तर गणित विभागातील वैष्णवी मल्लिकार्जुन चोले तृतीय आणि उत्तेजनार्थ म्हणून वैष्णवी उमेश जाधव,शिवम शरद पाटील यांना पारितोषिक देण्यात आले,सदर प्रसंगी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख डॉ मंगेश भोसले, डॉ व्हि.ए.गायकवाड ,प्रा आर.आर कदम यांच्या सह सर्व विज्ञान विभागातील प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# आयटकच्या वतीने बांधकाम कामगारांचा बार्शी येथे मेळावा संपन्न

## बांधकाम कामगार फेडरेशन राज्य कौन्सिलची बैठक संपन्न

बार्शी (प्रतिनिधी) : आयटक संलग्न महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना सोलापूर जिल्हा कौन्सिल यांच्या वतीने बांधकाम कामगारांचा भव्य मेळावा संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आयटकचे ज्येष्ठ नेते कॉ. तानाजी ठोंबरे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयटकचे राज्य सरचिटणीस कॉ. शाम काळे, बांधकाम कामगार संघटना राज्याध्यक्ष कॉ. विजय बचाटे, कार्याध्यक्ष कॉ. विजय कांबळे, कॉ. भीमा पाटील, कॉम्रेड प्रविण, सुरेखा शितोळे हे उपस्थित होते. मेळाव्यात सर्व राज्य कौन्सिल सदस्य, जिल्हा पदाधिकारी तसेच विविध तालुक्यातील बांधकाम कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आयटक चे राज्य सरचिटणीस कॉम्रेड शाम काळे म्हणाले शासनाच्या विविध योजना, कामगार नोंदणी, विमा योजना, शिक्षण सहाय्य, आरोग्य सुविधा आदी योजना या आयटकच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट डाव्या चळवळीने मिळवून दिलेल्या आहेत. ज्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला पाहिजे तो लाभ मिळत नाही ही खेदाची बाब आहे. शासन वेगवेगळ्या योजना आणून बांधकाम कामगारांचे मूलभूत जगण्याचे प्रश्न बाजूला टाकत आहेत. बांधकाम क्षेत्रातील असंघटित कामगारांनी संघटित होऊन आपल्या हक्कांसाठी लढा द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. बांधकाम कामगार संघटनेचे राज्याध्यक्ष विजय बचाटे यांनी



बांधकाम कामगारांच्या विरोधामध्ये असणारे चार नवीन लेबर कोड रद्द करण्यात यावे , बांधकाम कामगारांना वयाच्या साठ वर्षांनंतर सहा हजार रुपये पेन्शन देण्यात यावी, बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबासाठी ई. एस. आय. दवाखाना सुरू करावा, सर्व भूमिहीन बांधकाम कामगारांना घर, जागा व घर बांधून देण्यासाठी महागाईच्या दरानुसार किमान पाच लाख रुपयांपर्यंत मदत द्यावी, ग्रामीण व शहरी भेदभाव न करता पी. एम. आवास योजनेअंतर्गत घर मिळावे, कामगारांच्या हितासाठी ऑनलाइन प्रणालीमध्ये असलेल्या चुका दुरुस्ती करून मिळाव्यात, १ जानेवारी २०१५ रोजी प्रतिष्ठित शिक्षण संस्था व प्रस्थापित वर्गातील ठेकेदार यांचे रेकॉर्ड तपासण्यात यावे , या मागण्यांच्या पूर्ततेसाठी तीव्र लढा उभारण्याचा निर्धार करूयात असे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे म्हणाले कष्टकरी वर्गाचे लढे शासन उध्वस्त करू पाहत आहे, कष्टकरी वर्गाचे सर्व कायदे मोडले जात आहेत , त्या विरोधामध्ये कष्टकरी वर्गाचा भाग म्हणून आपल्याला तीव्र लढा उभा करावा लागेल, जाती-धर्म याच्या पलीकडे जाऊन कष्टकरी वर्गाचे जगण्याचे प्रश्न तीव्र करूयात. मेळाव्यात प्रमुख्याने कॉ. बालाजी शितोळे राज्य उपाध्यक्ष व जिल्हा कार्याध्यक्ष, कॉ. नानासाहेब ठाकरे, जिल्हा उपाध्यक्ष, कॉ. राजू ढेंबरे, जिल्हा सहसचिव, कॉ. अनिरुद्ध नखाते, भारत चव्हाण, ऋषिकेश शितोळे, सुयश शितोळे, अण्णासाहेब ठाकरे, दादासाहेब गंगाधर, कॉ. अतुल ठाकरे, कॉ. परमेश्वर नागटिळक, कॉ. महादेव कसबे, कॉ. दशरथ भालके, कॉ. बालाजी ठाकरे, कॉ. अतुल ठाकरे, कॉ. संतोष आखाडे, नाना माने , कॉ. वाल्मिक आखाडे, कॉ. रामचंद्र मस्के, कॉ. परशुराम यादव, कॉ. दादा काकडे, कॉ. दत्तात्रेय लेडवे, कॉ. संतोष पाटील, कॉ. संतोष चव्हाण, कॉ. मंगुराज नलावडे, कॉ. नितीन गायकवाडे, शितल गायकवाड, शितल भंडारी , सोनाली गायकवाड , उज्वला चंदनशिवे , नंदिनी किनकर , मंजुळा गवळी, बाबा कांबळे, साईनाथ झांबरे आदी उपस्थित होते.

# विद्रोही विचारांचे ज्येष्ठ पुरस्कर्ते कॉ. प्रा. तानाजी ठोंबरे यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

# नांदेड येथे होणाऱ्या २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनात होणार सन्मान

बार्शी प्रतिनिधी : (राजश्री गवळी ) समाज परिवर्तनाच्या विद्रोही साहित्य चळवळीला आयुष्यभर वाहून घेतलेल्या कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे यांना नांदेड येथे २७, २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनात प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या दीर्घकालीन साहित्यिक, सामाजिक व वैचारिक योगदानाची दखल घेत हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. विद्रोही साहित्य संमेलन ही परंपरा महात्मा जोतीराव फुले यांनी प्रस्थापित व्यवस्थेतील साहित्यिक प्रवाहाविरोधात घेतलेल्या विद्रोही भूमिकेचा वैचारिक वारसा पुढे नेणारी चळवळ मानली जाते. सामाजिक न्याय, समता आणि परिवर्तनवादी विचारांना बळ देण्याचे कार्य या संमेलनाच्या माध्यमातून सातत्याने केले जात आहे. कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे यांनी विद्रोही साहित्य चळवळीमध्ये सक्रिय भूमिका बजावत २००५ साली सोलापूर येथे पार पडलेल्या विद्रोही साहित्य संमेलनाचे यशस्वी संयोजन केले होते. सोलापूर जिल्ह्यात झालेले हे संमेलन विद्रोही चळवळीतील अत्यंत प्रभावी आणि गाजलेले संमेलन म्हणून ओळखले



जाते. तसेच २०१५ मध्ये बार्शी येथे पार पडलेल्या कॉम्रेड अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन संयोजन समितीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय नेतृत्व केले होते. प्रा. ठोंबरे यांनी आपल्या लेखनातून महात्मा फुले यांची शैक्षणिक भूमिका, विठ्ठल रामजी शिंदे यांचे समाजसुधारक विचार, आगरकरांचे विवेकवादी साहित्य, शाहिर अमर शेख यांचे लोकशाहीर कार्य, कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य तसेच कॉम्रेड ए. बी. बर्धन यांच्या वैचारिक योगदानावर अभ्यासपूर्ण पुस्तके लिहून परिवर्तनवादी साहित्य समृद्ध केले आहे. मार्क्स–फ ुले–आंबेडकरवादी विचारसरणीचा पुरस्कार करत त्यांनी दलित, काम गार, शेतकरी, विद्यार्थी व युवकांच्या विविध सामाजिक चळवळींमध्ये आयुष्यभर सक्रिय सहभाग नोंदविला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कार्यकारिणी सदस्य म्हणूनही त्यांनी संघटनात्मक पातळीवर प्रभावी काम केले आहे. नांदेड येथे होणाऱ्या या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लोकनाथ यशवंत (नागपूर) असून उद्घाटक म्हणून दिल्ली येथील बजरंग तिवारी उपस्थित राहणार आहेत. स्वागताध्यक्ष राहुल प्रधान, जेएनयू दिल्लीचे मिलिंद आव्हाड, विद्रोही साहित्य संस्कृती सभेच्या राज्याध्यक्षा प्रा. प्रतिमा परदेशी तसेच किशोर धमाले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रा. ठोंबरे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. समाज परिवर्तनवादी साहित्य, चळवळ आणि वैचारिक संघर्ष यांचा संगम घडवून आणणाऱ्या कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे यांच्या सन्मानामुळे विद्रोही साहित्य चळवळीला नवचैतन्य मिळणार असल्याची भावना साहित्य व सामाजिक क्षेत्रातून व्यक्त होत आहे

## शिबिराच्या माध्यमातून योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात न्या.शैलेश ब्रम्हे

### विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा



धाराशिव दि.१ मार्च (जिमाका) विविध योजनांची अंमलबजावणी करणे हे कठीण व जिकरीची काम आहे.शासनाच्या विविध कल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या नाही,तर त्या कागदावरच राहतात.या महाशिबिराच्या माध्यमातून विविध योजना ह्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात. असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे न्यायमूर्ती तथा पालक न्यायम ूर्ती.शैलेश ब्रम्हे यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आज १ मार्च रोजी धाराशिव येथील लेडीज क्लब येथे आयोजित विधी सेवा महाशिबिर व शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे उद्घाटन न्या.श्री.ब्रम्हे यांच्या हस्ते करण्यात आले.या निमि त्ताने आयोजित कार्यक्रमात न्या.श्री.ब्रम्हे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा न्या.श्रीमती अभिश्री देव,प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलिस अधीक्षक श्रीमती.रितू खोखर,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या.श्रीमती भाग्यश्री पाटील व जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ॲड.अमोल वरुडकर यांची उपस्थिती होती.

न्या.ब्रम्हे पुढे म्हणाले की,या महाशिबिरासाठी आलेल्या नागरिकांनी येथे लावण्यात आलेल्या प्रत्येक स्टॉलला भेट देऊन संबंधित विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजना,अभियान व उपक्रमांची माहिती काळजीपूर्वक जाणून घ्यावी.आपल्याला कोणत्या योजनेचा लाभ मिळू शकतो त्याची माहिती घेऊन कागदपत्रांची पूर्तता करावी.केवळ स्वतः पुरत्याच या योजनांची माहिती जाणून न घेता आपल्या गावातील नागरीकांना, लाभार्थ्यांना तसेच आपल्या शेजाऱ्यांना या महामेळाव्यातून गावाला पोहोचल्यावर त्यांना योजनांची माहिती देऊन योजनांचा लाभ घेण्यात प्रोत्साहित करावे.योजनांच्या लाभामुळे त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.असे न्या.ब्रम्हे यांनी सांगितले.

विधी सेवा प्राधिकरण व प्रशासनाने या म हाशिबिराच्या माध्यमातून योजनांची माहिती देणे व त्याचा लाभ मिळवून देण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे, असे सांगून न्या.श्री.ब्रम्हे म्हणाले की, भारतीय संविधानाने सामाजिक व आर्थिक न्याय सांगितला आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अथक परिश्रमातून भारतीय संविधानाची निर्मिती झाली आहे.

## सुयश विद्यालय, बार्शी येथे विज्ञान प्रदर्शनाच्या आयोजनाने विज्ञान दिन उत्साहात साजरा

बार्शी, प्रतिनिधी (राजश्री गवळी ) – सुयश विद्यालय, बार्शी येथे राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात आणि शैक्षणिक वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्त विद्यालयात भव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या डॉ. अमृता मांडे शेटे यांच्या हस्ते संपन्न झाले.





याप्रसंगी मा पत्रकार गणेश शिंदे मा पत्रकार विनोद ननवरे पत्रकार शंकर लाखे पत्रकार धिरज शेळके पत्रकार शाम थोरात पत्रकार विजय शिंगाडे उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर डॉ. अमृता मांडे शेटे यांच्या हस्ते फित कापून विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक संकल्पनांवर आधारित आकर्षक आणि नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. सौरऊर्जा, जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, रोबोटिक्स, विद्युत परिपथ, पावसाचे पाणी साठवण, तसेच आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित अनेक उपयुक्त मॉडेल्स विद्यार्थ्यांनी साकारले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांचे सविस्तर आणि आत्म विश्वासपूर्ण सादरीकरण करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. यावेळी मार्गदर्शन करतांना इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत सुयश विद्यालयाने जो महत्वकांक्षी फाउंडेशनचा उपक्रम राबवलेला आहे याच्या अंतर्गत विद्यार्थ्यांच्या विज्ञान विषयाच्या संकल्पना दृढ झाल्याचे मा. डॉ. अमृता मांडे यांनी स्पष्ट केले

डॉ. अमृता शेटे-मांडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत सांगितले की, विज्ञानामुळेच मानवाचे जीवन अधिक सोपे, सुरक्षित आणि प्रगत झाले आहे. विद्यार्थ्यांनी विज्ञानाची आवड जोपासून भविष्यात संशोधन आणि नवकल्पनांच्या क्षेत्रात योगदान द्यावे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, जिज्ञासा आणि संशोधनाची आवड निर्माण होण्यास मोठी मदत झाली. कार्यक्रमाचा समारोप उपस्थित मान्यवरांचे आभार मानून उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यालयात विज्ञान दिन खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

## सोलापूरचा पारा चढला ! हंगामातील सर्वाधिक ३७.२ तापमानाची आज नोंद




सोलापूर : मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच सोलापूर शहरात उन्हाचा पारा चांगलाच चढला आहे. सोलापूर हवामान कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, आज (१ मार्च) या सप्ताहातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली असून शहरात उन्हाची तीव्रता कमालीची वाढली आहे. या सप्ताहातील उच्चांकी तापमान: आज दुपारी कमाल तापमान ३७.२ओउ (९९.0ओऋ) वर पोहोचले.

या आठवड्यात नोंदवले गेलेले हे आतापर्यंतचे सर्वाधिक तापमान आहे. आजचे किमान तापमान २०.७ओ उ (६९.३ओऋ) इतके राहिले, ज्यामुळे पहाटेच्या तुलनेत दुपारी तापमानात मोठी तफावत दिसून आली. कोरड्या हवामानामुळे हवेतील आर्द्रता ४०% इतकी नोंदवण्यात आली आहे. सप्ताहाच्या सुरुवातीलाच तापमानाने उच्चांक गाठल्यामुळे आगामी दिवसांत उष्णतेची लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अचानक वाढलेल्या या तापमानामुळे नागरिकांनी दुपारच्या वेळी बाहेर पडताना काळजी घ्यावी, असे आवाहन हवामान कार्यालयाने केले आहे.

## शांभवी कल्याणशेट्टी यांनी नकार ; तर रामप्पा चिवडशेट्टी यांचे नाव आघाडीवर

सोलापूर, भारतीय जनता पक्षकडून सोलापूर जिल्हा परिषद अ ध्य क्ष - उ पा ध्य क्ष निवडीबाबत अद्यापही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. अध्यक्षपदासाठी आघाडीवर असलेल्या शांभवी कल्याणशेट्टी यांनी आपण इच्छुक नसल्याचे स्पष्ट केल्यानंतर स्पर्धा अधिकच रंगली आहे. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या शर्यतीत अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यांत विभागलेल्या वळसंग जिल्हा परिषद गटातील सदस्य रामप्पा चिवडशेट्टी यांचे नाव आता पुढे येत आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे सोलापूर दौऱ्यावर असून, संबंधित तालुक्यांतील भाजप लो क प्र ति नि धीं सो ब त होणाऱ्या बैठकीत जिल्हा परिषदेच्या आगामी पदाधिकाऱ्यांबाबत अंतिम शिक्कामोर्तब होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.भाजपकडे ज्या विधानसभा मतदारसंघात आमदार नाहीत, अशा तालुक्याला पुढील अडीच वर्षांसाठी अध्यक्षपद देण्याचे धोरण अवलंबले जाऊ शकते, अशी चर्चा पक्षवर्तुळात सुरू आहे. दरम्यान, आ. सुभाष देशमुख यांची नाराजी दूर करून त्यांचे आणि आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्यात समन्वय साधण्यासाठी भाजपकडे रामप्पा चिवडशेट्टी यांच्या रूपाने अध्यक्षपदाचा सक्षम पर्याय असल्याचा दावा राजकीय तज्ज्ञांकडून केला जात आहे. सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्षपदाचा निर्णय आता कोणाच्या पारड्यात पडतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे

आमदारकी-मंत्रीपदाच्या चर्चेमुळे सावध भूमिका आगामी विधान परिषद निवडणुका तसेच राज्यपाल कोट्यातून आमदारकीच्या शक्यतांबाबत जिल्ह्यातील काही तालुकास्तरीय नेत्यांना आश्वासने देण्यात आल्याची चर्चा आहे. तसेच सरकारच्या उत्तरार्धात जिल्ह्यातील भाजप आमदाराला मंत्रीपद मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभापती पदांसाठी इच्छुक असलेल्या नेत्यांनी सध्या सावध भूमिका घेतल्याचे दिसून येते. नेत्यांची आमदारकी किंवा संभाव्य मंत्रीपद हेच जिल्हा परिषदेतील भावी पदाधिकाऱ्यांसाठी अडसर ठरत असल्याची चर्चा भाजपच्या गोटात रंगली आहे.

## रुक्मिणी जत्रेत पालकमंत्र्यांनी जागवली महिलांमध्ये उमेद हक्काचा मॉल आणि गावात कार्यालय देणार

सोलापूर ; – राज्यातील सर्व महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन महिलांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. उमेद च्या माध्यमातून राज्यातील सर्व महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या माध्यमातून सर्व महिलांना लखपती दीदी बनवण्याची ग्वाही राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज्यमंत्री चा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

नॉर्थ कोर्ट मैदान येथे ग्रामविकास व पंचायत राज विभाग जिल्हा परिषद सोलापूर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर उमेद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान आयोजित रुक्मिणी महोत्सव व मिनी सरस जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन या कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ते मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबसे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा परिषद सदस्य चेतन केदार ,नगरसेविका रोहिणी तडवळकर, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जगताप आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे म्हणाले की, महिला बचत गटांनी स्वतः उत्पादित केलेल्या मालांचे वस्तूचे विक्री व प्रदर्शन करण्यासाठी हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून हा मिनी सरस जिल्हा रुक्मिणी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महिलांची आर्थिक बळकटी व सक्षमीकरणासाठी हा महोत्सव घेण्यात येतो. उमेद च्या माध्यमातून देशाचे पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहाव्या, त्यांना मानाने, सन्मानाने जगता यावे त्यांना मानाचे स्थान मिळावे यासाठी उमेदच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात, असे त्यांनी सांगितले.

तसेच महिला बचत गटाच्या माध्यमातून नवनवीन मोठे उद्योग महिलांनी निर्माण करावे, तसेच प्रत्येक गावागावांमधून महिला बचत गटाच्या माध्यमातून प्रत्येक गावी एक प्रभाग संघ निर्माण व्हावे अशी भूमिका ठेवून आपण सर्वांनी काम करावे. गावातील दूध व्यवसाय करणाऱ्या महिलांनी स्वतःची दूध बँक तयार करावी. शेळ्या, मेंढ्या व गाई पालन हा व्यवसाय सर्वात जास्त पैसा मिळवून देणारा ग्रामीण भागातील व्यवसाय आहे. महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून उत्पादित केलेल्या मालाला चांगले पॅकिंग केले तर चांगला पैसा मिळतो. महिलांच्या उत्पादित मालाला हक्काची बाजारपेठ मिळण्यासाठी सोलापूर जिल्ह्यासाठी उमेद मॉल मंजूर केला गेला आहे, अशी ही माहिती पालकमंत्री गोरे यांनी दिली. उमेद मॉल मुळे सोलापूर जिल्ह्यातील महिलां च्या उत्पादित वस्तूंसाठी बारा महिने हक्काची बाजारपेठ मिळणार आहे . राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यात मुख्यमंत्री महोदयांनी असे मॉल मंजूर केले आहेत. तसेच गावांमध्येमहिला बचत गटाच्या बैठकीसाठी हक्काचे कार्यालय निर्माण करून देण्याचा प्रस्ताव आम्ही शासनाकडे सादर केला जाणार असल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

या महोत्सवात महिला बचत गटांचे ८० स्टॉल लागलेले आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या स्टॉलला भेट देऊन महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंची खरेदी करावी असे आवाहन करण्यात आले. हे प्रदर्शन नॉर्थ कोर्ट मैदान येथे दिनांक १ ते ५ मार्च २०२६ या कालावधीत आहे. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व समारोप प्रकल्प संचालक श्री. जगताप यांनी केले.

## मंद्रुप पोलीसांची बेकायदेशीर दारू माफियांना जोरदार दणका, न्यायालयाचे आदेशावरून दिड लाखाचा दारू साठा जमीनदोस्त

कायद्याला आव्हान देणाऱ्यांसाठी कडक इशारा

मंद्रूप पोलीस ठाणे हद्दीत बेकायदेशीर दारू विक्री, साठवणूक किंवा वाहतूक करणाऱ्यांवर यापुढेही अशाच प्रकारे धडक आणि निर्दयी कारवाई करण्यात येणार आहे. कायद्याचा धाक कायम ठेवणे आणि नागरिकांना सुरक्षित वातावरण देणे. हेच आमचे ध्येय. सदर कारवाई पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या समन्वयातून यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली.

शंकर पटवारी
पोलिस निरीक्षक, मंद्रूप पोलीस स्टेशन




दैनिक राजस्व
अशोक सोनकंटले
प्रतिनिधी दक्षिण
सोलापूर

मंद्रूप पोलीस ठाणे हद्दीत दाखल विविध गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेल्या बेकायदेशीर देशी व विदेशी दारूच्या मोठ्या साठ्यावर आज कायदेशीररित्या हातोडा मारण्यात आला. मा. न्यायालय सोलापूर यांच्या आदेशानुसार व मा.पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी सर, मा.अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, मा. उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत देवळेकर,यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शंकर पटवारी, यांचे सूचनेनुसार पोलीस उप निरीक्षक राजकुमार डांगे,सहा.फौजदार पाटील, महिला पोलीस कॉन्स्टेबल कांबळे यांनी पंचासमक्ष संपूर्ण मुद्देमाल फोडून नष्ट करण्यात आला. कारवाईचा थरारक तपशील विविध गुन्हे क्रमांकांतील जप्त दारू,९० मि.ली., १८० मि.ली. व इतर क्षमतेच्या शेकडो बाटल्या, हातभट्टी दारूचे हजारो लिटर प्रमाणात जप्ती,नामांकित ब्रँड्सचा मोठा साठा सदर सर्व दारू पोलीस ठाणे परिसरालगत असलेल्या खड्ड्यात टाकून प्रत्यक्ष पंचांच्या उपस्थितीत फोडून नष्ट करण्यात आली. संपूर्ण कारवाईचे छायाचित्रण करून नोंद ठेवण्यात आली आहे.

## हत्तरसंग कुडल रस्त्याची दुरावस्था, प्रवाशी आणि नागरिकांचे हाल

रस्ता खराब झाल्याने आणि रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्याने नागरिकांना प्रवास करण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागत आहे आणि हत्तरसंग येथील शंभूराजे चौक ते संगमवस्ती येथील रस्त्यावर देखील खूप खड्डे पडले असून तरी लवकरच दोन्ही रस्ता दुरुस्ती करण्यात यावी. यात दक्षिण सोलापूर तालुक्याचे आमदार सुभाष देशमुख यांनी याकडे लक्ष देऊन लवकरच रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावी.

सायबण्णा भतगुणकी
मा.तंटामुक्त अध्यक्ष (हत्तरसंग)



दैनिक राजस्व
अशोक सोनकंटले
प्रतिनिधी/दक्षिण
सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंगकुडल एक सोलापूर जिल्ह्यातील पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते.तर सध्या हा रस्ता अनेक खड्ड्याने रस्ता ना दुरुस्त झाला असल्याने त्या रस्त्याने वाहने मोठ्या प्रमाणात ये जा करत असतात. आणि दर रविवारी भाविक पर्यटन स्थळ भेटीसाठी येत असतात त्यामुळे रस्ता खराब असल्याने मोठी वाहन आणि कारचालकामध्ये नाराजी दिसून येत आहे. त्या खराब रस्त्याने धुळीचे साम्राज्य जास्त प्रमाणात वाढले आहे.तरी लवकर हा रस्ता दुरुस्ती व्हावी अशी मागणी प्रवासी आणि हत्तरसंगकुडल ग्रामस्थांमधून करण्यात येत आहे.

## सोलापूर लेडीज टेलर असोशिएशनच्यावतीने जागतिक टेलर दिन साजरा

सोलापूर/ प्रतिनिधी
सोलापूर लेडिज टेलर असोसिएशनच्यावतीने जागतिक टेलर दिनानिमित्त सोलापूरातील जुन्या काळातील या क्षेत्रात असणाऱ्या व उत्कृष्ट कामगारांचा सत्कार करून टेलर दिन साजरा करण्यात आला.




सोलापूर लेडिज टेलर असोसिएशनच्यावतीने जागतिक टेलर दिनानिमित्त दत्त नगर येथील दत्त मंदिर येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक प्रथमेश कोठे, नगरसेवक सतिश सिरसिल्ला, अविनाश दासरी, उद्योगपती अमर पवार, उद्योगपती लक्ष्मीकांत चाटला, अँड. प्रियांका गोरंटी, अध्यक्ष नरेश कोलप्याक, उपाध्यक्ष विनायक जिंदम, सचिव पुंडलिक पगडीमल यांच्या प्रमुख उपस्थिती हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सोलापूरमध्ये लेडिज टेलर नावलौकिक मिळविलेले सुदर्शन गोगा, मधुसुदन येलदेटी, दतात्रय बंडी, राजु कामुती, नागनाथ साका, पुंडलिक पगडीमल, नागेश मंडल, राजेंद्र गुतीकोंडा, विनायक लोखंडे, नरेश मंडप आदींचा सत्कार करण्यात आला. आपल्या कुशल हातानी समाजाला सौदर्य, आत्मविश्वास आणि ओळख देण्याचे कार्य करणारे म्हणून मान्यवरांना प्रतिक्रिया दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अरूण म्याकम, सुंदरम म्याकल, अशोक बाहेती, उदयन इरकुला, गोपी तुम्मा, राजू कामुर्ती, लक्ष्मीकांत देवतराज, अमरिष पुकाळे, नरेश गडगी आदींनी परिश्रम घेतले. फोटो आहे.

Dainik.Rajaswa @dainik_rajaswa dainik.rajaswa Dainik Rajaswa News